वार्ता टिपण दिनांक ११/०८/२०१९

## विक्री करण्यासाठी कोकेन जवळ बाळगणा-या नायजेरियन नागरिकास खंडणी व अंमली विरोधी पथक,गुन्हे शाखा,पुणे यांचेकडुन अटक

पुणे शहराचे मा.पोलीस आयुक्त श्री.डॉ.वेंकटेशम सो., पोलीस सह आयुक्त श्री.रविंद्र शिसवे सो., गुन्हे शाखे्चे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे सो.पोलीस उपायुक्त श्री. बच्चनसिंग सो. सहा. पोलीस आयुक्त श्री.शिवाजी पवार सो. यांचे मार्गदर्शनाखाली, दिनांक १०/०८/२०१९ रोजी गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.गजानन पवार व इतर पोलीस स्टाफ असे बंडगार्डन पोस्टेचे हददीत अंमली पदार्थ विरोधी संबंधाने गस्त घालीत असताना, त्यांना हॉटेन ब्लु नाईल समोर नायजेरियन देशाचा नागरीक नामे खिस्टीयन ऊर्फ लायनस उवाडीएग्यु अली , वय-४७ वर्षे, सध्या रा. मिरा रोड मुंबई मुळ रा. एनग्यु स्ट्रीट नायजेरिया देश.हा संशयास्पद रितीत उभा असताना मिळालेने त्याची दोन पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री.गजानन पवार यांनी झडती घेतली असता,त्याचेकडे खालीलप्रमाणे कोकेन व इतर वस्तु मिळुन आल्या आहेत.

१) ४७,५००/- प्लास्टिकसह ४ ग्रॅम २१० मिलीग्रॅम वजानाचे पांढरे रंगाचे कोकेन अंमली पदार्थ.
२) २०००/- एक सॅमसंग कंपनीचा डयुअल सिमचा मोबाईल हॅन्डसेट,
३) ५३०/- रोख रक्कम

---------------

एकुण ५०,०३०/- रू.चा माल मिळाला आहे.तो पंचनाम्याने जप्त केला आहे. त्याबाबात पोलीस निरीक्षक श्री.गजानन पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वर नमुद नायजेरियन इसमाविरूध्द बंडगार्डन पोस्टे पुणे येथे गु.र.नं. ३३४/२०१९ एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क), २१(ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.सदर गुन्हयात वर नमुद नायजेरियन इसमास दि.११/०८/१९ रोजी ०२/४० वा.अटक केली आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोहिते हे वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली करीत आहेत. वर नमुद नायजेरियन आरोपीची मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.न्यायालय क्र.३ पुणे यांनी दि.१४/०८/१९ रोजीपर्यंत पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते,गजानन पवार,सपोनिरी जयवंत जाधव,पोलीस आनंद रावडे,पोलीस कर्मचारी संतोष मते, विजय गुरव, सुनिल चिखले, प्रविण पडवळ, दिनेश गडांकुश,विनायक जाधव,संतोष देशपांडे, विठठल बंडगर,नवनाथ चांदणे,नारायण बनकर, प्रमोद मगर,महेश कदम,मंगेश पवार,अविनाश शिंदे यांनी केली आहे.